RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २] बुधवार, फेब्रुवारी १८, २०२६/माघ २९, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. .. | **पृष्ठे १–३** |

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १८ फेब्रुवारी २०२६.

MAHARASHTRA ORDINANCE No. I OF 2026.

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC
UNIVERSITIES ACT, 2026.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात
आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता, राज्य शासनास, १५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल.";

(२) खंड (छ) मधील, दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ( २०१७ चा महा. ६ ) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरु करण्यासाठी परवानगीच्या कार्यपद्धतींची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम ( ३ ) च्या खंड ( घ ) मध्ये अशी तरतूद केली आहे की, विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासन, उक्त कलम १०९ च्या खंड ( ग ) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशींनंतर लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देऊ शकेल.

**२.** स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे, शासनास, विहित कालावधीत, इरादा पत्र देणे शक्य झाले नाही. म्हणून, शासनास, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी उच्च शिक्षणाचे महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण संस्था सुरु करण्याकरिता राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक वाढविता यावा म्हणून, कलम १०९ च्या पोट-कलम ( ३ ) च्या खंड ( घ ) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ( २०१७ चा महा. ६ ) यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १८ फेब्रुवारी २०२६.

**आचार्य देवव्रत,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.